
शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १७२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

युवा आदर्श



# शिवजयंती जल्लोष!





जालना शहरात शिवजयंतीचा मोठा उत्सव साजरा करण्यात आला. मराठा क्रांती मोर्चा, सर्वपक्षीय शिवजयंती उत्सव समिती, राजकीय पक्ष- सामाजिक संघटना व शिवप्रेमींकडून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे जल्लोष करण्यात आला. यावेळी खासदार कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, जिल्हाधिकारी आशीमा मित्तल, पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, सुभाष देविदान, अंकुशराव राऊत, रवींद्र राऊत, सतीश जाधव, रोहित भुरेवाल, आदर्श राऊत, सागर देवकर, शिवप्रकाश चितळकर, महापौर वंदनाताई मगरे यांच्यासह शिवप्रेमींची उपस्थिती होती. रॅली, देखाव्यांनी शहर शिवमय झाले होते. (छायाचित्रे- किरण खानापुरे, अनिल व्यवहारे, जावेद तंबोली)








सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई व जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंती कार्यक्रम उत्सवात साजरा

## शिवरायांचे स्मरण केल्यास आत्मविश्वास निर्माण होतो - आमदार खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराजांच्या रक्तात भिती नावाच्या पेशी नव्हत्या त्यामुळे ते प्रत्येक काम कुठल्याही भीतीविना करत असत. शिवरायांचे स्मरण केल्यास आत्मविश्वास निर्माण होत असल्याचे प्रतिपादन आ. अर्जुन खोतकर यांनी केले.



सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई व जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १८ व १९ फेब्रुवारी, २०२६ रोजी जालना येथे **पान २ वर**

## शिवरायांचे विचार हीच काळाची गरज - शिवश्री हर्षलजी व्यवहारे

'ग्रो अप इन्स्टिट्यूट' मध्ये शिवजयंती साजरी

**जालना । प्रतिनिधी -** येथील नामांकित शिक्षण संस्था 'ग्रो अप इन्स्टिट्यूट' मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून 'शिवजयंती' मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने प्रख्यात वक्ते शिवश्री. हर्षलजी व्यवहारे यांचे 'आजच्या काळात शिवविचारांची प्रासंगिकता' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान संपन्न झाले.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी इन्स्टिट्यूटचे संचालक आकाशजी उबाळे, प्रा.नितीनजी जैस्वाल, नम्रता जैस्वाल मॅडम, प्रा. श्रीरामजी बेळनुर प्रा. अमोलजी जैस्वाल तसेच प्रमुख **पान २ वर**



## संपादकीय पान

# ऑल दि बेस्ट...!

फेब्रुवारी मार्च महिना म्हटलं की परीक्षांचा हंगाम. दरवर्षी याच दोन महिन्यात परीक्षा होतात. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षाही याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय यासारख्या स्पर्धा परीक्षाही याच काळात होतात. इयत्ता ५ वि आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा २२ फेब्रुवारी रोजी आहे. दहावीची बोर्ड परीक्षा आजपासून म्हणजे २० फेब्रुवारी पासून सुरू होत असून ती १८ मार्च पर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षाही १० फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून ती ११ मार्च पर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. दहावी - बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे कारण नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. वेळेवर झोपून वेळेवर उठावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. या काळात शक्यतो बाहेर खाणे टाळावे. घरी बनवलेले जेवण वेळेवर करावे. पालकांनीही याकाळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. त्याला सतत परीक्षेची आठवण करून देऊ नये. त्याच्याशी हसून खेळून प्रेमाणे वागावे. पालकांनी स्वतःही परीक्षेचे टेन्शन घेऊ नये आणि मुलांनाही देऊ नये. जर विद्यार्थी परिक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल. दहावी बारावीच्या परीक्षा आयुष्यातील महत्वाचा टप्पा असला तरी शेवटचा टप्पा नाही त्यामुळे टेन्शन फ्री राहा. मन शांत ठेवून प्रश्नपत्रिका सोडवा. यश नक्की मिळेल. सर्व विद्यार्थी मित्रांना या बोर्ड परीक्षांसाठी मनापासून शुभेच्छा! ऑल दि बेस्ट...!!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

## शिवरायांचे स्मरण ...

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्य कर्तृत्व व शौर्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमांचे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, टाऊन हॉल, जालना येथे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी श्री. खोतकर बोलत होते.

यावेळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल उपजिल्हाधिकारी रोहयो मनिषा दांडगे, उप विभागीय अधिकारी जालना रामदास दौंड, तहसीलदार जालना छाया पवार, अतिरिक्त आयुक्त जालना शहर महानगरपालिका अर्जुन गिराम, उपायुक्त जालना शहर महानगरपालिका नंदा गायकवाड, तहसीलदार बदनापूर अतुल बने यांची उपस्थिती होती.

श्री. खोतकर पुढे म्हणाले की, स्वराज्य म्हणजे सत्ता नव्हे, स्वाभिमान आहे हे शिवरायांनी आपल्या कार्यशैलीतून दाखवून दिले. शिवाजी महाराजांनी त्या काळी लोकाभिमुख प्रशासनाची निर्मिती करुन गुड गव्हर्नस चा पाया रचला होता. शिवरायांनी शिस्तबद्ध, जलद व गतीमान प्रशासनाचा पाया रचला. शिवरायांची चिकीत्सकवृत्ती, निरीक्षण क्षमता, उत्कृष्ट कौशल्य, उत्तम अर्थतज्ञ यासह अन्य व्यक्तीमत्त्व विकसनाचे पैलू, उत्कृष्ट युद्धनिती, आधुनिक विचार सरणी हे त्यांचे वाखाणण्याजोगे गुण होते.

आज शाहीर रामानंद उगले यांनी शिवजन्माचा पोवाडा, माता जिजाऊने शिवरायांना कसे घडवले याबाबतचा पोवाडा, अफजलखानाचा वधाचा पोवाडा, दोनच राजे इथे गाजले, गाडी गुंगराची हे पोवाडेचे बहारदार सादरीकरण केले. यावेळी उपस्थित शिवप्रेमींनी या कार्यक्रमास प्रतिसाद दिला.

## शिवरायांचे विचार ...


अतिथी म्हणुन युवा उद्योजक सौरभ खटके, नारायण गोरे, वैभव भालेराव व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने व विद्यार्थी उपस्थित होते. आपल्या ओघवत्या शैलीत मार्गदर्शन करताना हर्षलजी व्यवहारे यांनी शिवरायांच्या व्यवस्थापन कौशल्याचे पैलू उलगडले. ते म्हणाले की: शिस्त आणि नियोजन: महाराजांचे स्वराज्य हे केवळ तलवारीच्या जोरावर नाही, तर चोख नियोजन आणि शिस्तीच्या जोरावर उभे राहिले. स्त्री सन्मान: महिलांचा आदर करणे ही शिवरायांची सर्वात मोठी शिकवण असून आजच्या तरुणाईने ती अंगीकारणे आवश्यक आहे. शून्यातून विश्व: जिद्दीच्या जोरावर स्वराज्य कसे निर्माण करावे, याचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरमध्ये डोळ्यासमोर ठेवावा. शिवाजी महाराज हे केवळ इतिहासातील राजा नाहीत, तर ते वर्तमानातील आदर्श आहेत. त्यांच्या युद्धनीतीसोबतच त्यांचे प्रशासकीय विचार अभ्यासावे लागतील.

व्याख्यानादरम्यान हर्षलजींनी सांगितलेल्या ऐतिहासिक प्रसंगांनी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. जय भवानी, जय शिवाजी च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या वतीने मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

# जल संवर्धनाच्या दिशेने संत निरंकारी मिशनचा सशक्त उपक्रम; 'प्रोजेक्ट अमृत'चा चौथा टप्पा

**जालना । प्रतिनिधी -** जेव्हा सेवा हीच साधना ठरते आणि निसर्गाविषयी संवेदनशीलता जीवनाचा मूलमंत्र बनते, तेव्हा समाजाला नवी दिशा देणारे पवित्र संकल्प जन्माला येतात. मानवसेवा व लोककल्याणाच्या या दिव्य भावनेला साकार रूप देत संत निरंकारी मिशनच्या वतीने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियानाच्या चौथ्या टप्प्याचा भव्य शुभारंभ रविवार, २२ फेब्रुवारी २०२६, सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत, परम श्रद्धेय सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनाखाली संपूर्ण भारतभर एकाच वेळी करण्यात येणार आहे.

संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले की, हा विशाल उपक्रम देशभरातील १५०० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी आयोजित केला जाईल. या महामोहिमेचे हे अभूतपूर्व प्रमाण या मोहिमेला ऐतिहासिक स्वरूप देईल, ज्यामुळे जलसंधारण आणि स्वच्छतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचेल.




पाणी हे केवळ एक साधन नसून जीवनाचा आधार आणि ईश्वराची अमूल्य देणगी आहे त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे हि जागृती समाजामध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. संत निरंकारी मिशनने बाबा हरदेव सिंह जी यांच्या प्रेरणादायी शिकवणी आत्मसात करून सन २०२३ मध्ये संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने 'प्रोजेक्ट अमृत'ची सुरुवात केली होती. जलसंवर्धन हा उपक्रम केवळ एखाद्या दिवसापुरता किंवा मर्यादित मोहिमेपुरता न ठेवता, तो एक जीवनशैली, संस्कार आणि सेवाभाव म्हणून स्वीकारण्याची प्रेरणा बनेल - जिथे स्वच्छ जलातून स्वच्छ मन आणि स्वच्छ समाज घडू शकेल.

नद्या, तलाव, सरोवरे, विहिरी व झरे अशा नैसर्गिक जलस्रोतांच्या संरक्षणासाठी समर्पित या जनआंदोलनाने आपल्या पहिल्या तीन टप्प्यांत सेवा, समर्पण व सहभागाचे उत्कृष्ट उदाहरण निर्माण केले आहे. याच यशामुळे प्रेरित होऊन हा चौथा टप्पा अधिक व्यापक, संघटित व दूरदृष्टीपूर्ण स्वरूपात राबविला जात आहे, ज्यामुळे समाजातील प्रत्येक घटकात निसर्गाबद्दल जागरूकता व सहभागाची सशक्त भावना निर्माण होईल.

मधुर समूह गायन, जनजागृती चर्चासत्रे आणि सोशल मीडिया मोहिमेद्वारे जलजन्य आजार आणि स्वच्छतेचे महत्व अधोरेखित केले जाणार आहे.जेव्हा मन निर्मळ असते तेव्हाच निसर्ग स्वच्छ राहतो, आणि जेव्हा सेवेत समर्पण असते तेव्हा समाजाचे नवनिर्माण होते हे अभियान त्याच संकल्पनेला बळ देणारे आहे .

सतगुरु माताजींचा संदेश सदैव हाच राहिला आहे की, आपण ही पृथ्वी पुढील पिढ्यांसाठी अधिक सुंदर, स्वच्छ आणि संतुलित स्वरूपात जपून ठेवली पाहिजे. 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' हे अभियान त्या पवित्र संकल्पाचे मूर्त स्वरूप आहे, जे समाजाला निसर्ग, समाज व आत्म्याशी जोडून करुणा, समतोल आणि सौहार्दपूर्ण भविष्याच्या दिशेने पुढे नेण्याचे काम करेल.

### भाजप जालना महानगरतर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

# छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आजही प्रेरणादायी - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या वतीने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, जालना येथे भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्यासह महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड यांची प्रमुख उपस्थिती होती.

छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. महाराजांच्या शौर्य, धैर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्य स्थापनेच्या कार्याचा गौरव केला.

भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्व समाजघटकांना एकत्र घेऊन न्याय, समानता आणि स्वाभिमान यांवर आधारित राज्य उभारले. त्यांच्या कार्यातून देशभक्ती, शौर्य आणि संघटनशक्तीचा आदर्श आजच्या पिढीने घ्यावा. शिवाजी महाराजांचे विचार आणि कार्य आजही राष्ट्रनिर्माणासाठी मार्गदर्शक आहेत. त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करून समाजहिताचे कार्य करण्याचा संकल्प आपण सर्वांनी करावा, असेही त्यांनी यावेळी आवाहन केले.

कार्यक्रमास भाजपचे नगरसेवक, पदाधिकारी, युवा मोर्चा, महिला मोर्चा पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# इंडियन पब्लिक स्कूल येथे शिवरायांचा जयघोष!



**हसनाबाद -** भोकरदन शहरातील इंडियन पब्लिक स्कूल येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.याप्रसंगी शाळेचे अध्यक्ष कृष्णा पाबळे सर यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.शाळेच्या वतीने आयोजित शोभायात्रेत सार्थक बरडे या विद्यार्थ्याने छत्रपती शिवरायांच्या वेशभूषेत घोड्यावर स्वार होऊन उपस्थितांचे मने जिंकून घेतले.सायली थिटे,सृष्टी पिसे, ज्ञानेश्वरी थोरात,माहिनी बरडे,गौरी चेके,प्रणव लोखंडे या विद्यार्थ्यांनी आक्रमक शैली मध्ये भाषणे त्याचप्रमाणे पल्लवी जंजाळ या विद्यार्थ्याने शिवजयंती निमित्त गीत तसेच छोट्या वर्गातील करण नवल या विद्यार्थ्याने शिवगर्जना म्हणत कार्यक्रमाची शोभा वाढवली.यापवेळी विलास चंडोल यांनी सूत्रसंचालन तसेच वैभव तांबडे यांनी आभार प्रदर्शन केले.सर्व शिक्षकवर्ग व विद्यार्थी यांनी मोलाचे योगदान देऊन कार्यक्रम संपन्न केला.

# गांधी चमन येथे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते शिवरायांना अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** श्री शिवछत्रपती सांस्कृतिक मंडळ जिल्हा जालना यांच्यावतीने गांधी चमन येथे आयोजित करण्यात आलेल्या सर्वपक्षीय शिवजयंती उत्सवाच्या ठिकाणी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी खासदार कल्याणराव काळे,आमदार अर्जुनराव खोतकर, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख,समीतीचे अध्यक्ष सुभाष देविदान,रवी राऊत यांच्या सह अन्य जणांची उपस्थिती होती



**जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकास्थित शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जगदंब प्रतिष्ठान जालना यांच्यावतीने आयोजित शिवजन्मोत्सव कार्यक्रमास भेट दिली. यावेळी प्रतिष्ठानचे यश सतकर, शंभू पाटील ,करण जाधव ,आकाश करामपुरी,श्रेयस मिसाळ, बालाजी धाकोडे, महेश पाटील, मंगेश कापसे, अंजिक्य शिंदे यांच्यासह प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते.**

# शहराच्या समस्यांबद्दल आमदार खोतकरांच्या 'जनता दरबारात' ॲड. धनावत आवाज उठवणार

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या अनेक गंभीर समस्या, ज्याकडे प्रशासनाचे आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष झाले आहे, त्या आता थेट आमदार अर्जुनराव खोतकर यांच्यासमोर मांडण्याचा निर्धार ड. महेश धनावत यांनी केला आहे. येत्या २० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जनता दरबारात, ड. धनावत हे सेंट मेरीज हायस्कूलच्या पुलाच्या संरक्षक भिंतीचा अभाव, अग्निशमन दलाच्या गाडीला आग विझवताना अडथळा ठरणारे रस्त्यातील उंच मॅनहोल, नया बाजार परिसरातील रस्त्यांची दुर्दशा, कालीकुर्ती परिसरातील कचरा डेपो, तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे जाणारा अर्धवट राहिलेला रस्ता यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर आवाज उठवणार आहेत.

शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या समस्यांमुळे नागरिकांचे हाल होत आहेत. सेंट मेरीज हायस्कूलच्या ९-एफ क्रमांकाच्या पुलाला संरक्षक भिंत नसल्याने विद्यार्थ्यांच्या आणि नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. तसेच, काही दिवसांपूर्वी लागलेल्या आगीच्या वेळी, रस्त्यातील उंच मॅनहोलमुळे अग्निशमन दलाची गाडी वेळेवर पोहोचू शकली नाही, ज्यामुळे मोठे नुकसान झाले. या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे आणि संतापाचे वातावरण आहे. नया बाजार परिसरातील कचरा आणि रस्त्यांची दुरवस्था तर पाचवीलाच पुजलेली आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे जाणारा रस्ता अर्धवट अवस्थेत असल्याने तेथे कामासाठी येणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो.

या सर्व समस्यांवर प्रशासनाचे लक्ष वेधूनही कोणताही ठोस उपाय योजला जात नसल्याने, ड. धनावत यांनी आता थेट आमदार खोतकरांच्या जनता दरबारात दाद मागण्याचा निर्णय घेतला आहे. या जनता दरबारातून या समस्यांवर तोडगा निघेल आणि नागरिकांना दिलासा मिळेल, अशी भावनिक साद त्यांनी घातली आहे.

याच पार्श्वभूमीवर ड. धनावत यांनी खासदार कल्याण काळे यांच्या कार्यपद्धतीवरही टीका केली आहे. आमदार अर्जुनराव खोतकर ज्याप्रमाणे 'जनता दरबार' घेऊन लोकांच्या समस्या ऐकून घेतात, त्यातून खासदार कल्याण काळे यांनी काहीतरी शिकावे. निवडणुकीनंतर ते जालन्यात क्वचितच दिसतात, असे ते म्हणाले.

ॲड. धनावत यांनी पुढे असेही सुचवले आहे की, या जनता दरबारानंतर शहरातील नगरसेवकांनीही आपापल्या प्रभागात अशाच प्रकारचे जनता दरबार आयोजित करून त्यात आमदार आणि खासदारांना बोलावून लोकांच्या समस्यांचे निराकरण करावे. लोकशाहीत लोकांचा आवाज ऐकला जाणे महत्त्वाचे आहे आणि अशा उपक्रमांमुळे लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्यातील संवाद वाढून शहराच्या विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## अतिवृष्टी अनुदान पंचनाम्यातून शेवली व नवीन सावंगी तलाव मंडळ वगळले; आंदोलनाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यासह तालुक्यातील शेवली व नवीन सावंगी तलान मंडळ सन २०२४-२०२५ या वर्षांमध्ये झालेल्या अतिवृष्टी अनुदान संदर्भात मौजे नेर मंडळातील काही गावे नवीन मंडळ सावंगी तलान यामध्ये समाविष्ट झालेले आहे. तसेच सावंगी तलान नवीन मंडळामध्ये पर्जन्यमापक यंत्र नसल्यामुळे सदरील विभागाने किंवा अधिकाऱ्याने शासनाला चुकीचे अहवाल सादर केल्यामुळे नवीन मंडळ सावंगी तलान हे अतिवृष्टी अनुदान मधून वंचित राहिले आले.तरी शेवली व नवीन मंडळ सावंगी तलान हे अतिवृष्टी अनुदान मध्ये



समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रीय बंजारा परिषदेचे मराठवाडा संघटक अंजेभाऊ चव्हाण यांनी दि.२५/०१/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांना निवेदन दिले होते. त्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालययांनी तहसीलदार जालना दि.१०/११/२०२५ रोजी यांना पत्र पाठवले असून,शेतकऱ्याच्या पिकाचे झालेल्या नुकसानीचे अतिवृष्टी संदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहे.तसेच शेवली व सावंगी तलान मंडळ अतिवृष्टी अनुदान पासून

पान २ वर

### जालना जिल्ह्यातील सतर्क पोलिसांची धडक कारवाई

## रामखेडा रेल्वे पटरी परिसरात हत्यारासह इसम ताब्यात

**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यातील बदनापूर-रामखेडा रेल्वे पटरी परिसरात एक इसम हातात धारदार हत्यार घेऊन फिरत असल्याची माहिती बदनापूर पोलिसांना मिळताच रात्री नाईट ड्युटीवरील पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. या कारवाईमुळे परिसरातील संभाव्य अनर्थ टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रेल्वे पटरीजवळ संशयास्पद हालचाल करत असलेल्या एका व्यक्तीबाबत पोलिसांना खबर मिळाली होती. त्यानुसार बदनापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक कुक्लारे, सहायक पोलीस निरीक्षक ढोबाळ, पोलीस अंमलदार अब्दुल बारी शेख व चालक सानप यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून संबंधित इसमाला वेढा घालत ताब्यात घेतले. त्याच्याकडील धारदार हत्यार जप्त करण्यात आले आहे.

ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव रोहित संतोष जाधव (रा. बालाजी मंदिर परिसर, डबलजीन, जुना जालना) असे असून त्याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल



करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या वेळी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा प्रकारच्या संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी. नाईट ड्युटीवरील पोलिसांच्या तत्परतेमुळे संभाव्य गंभीर घटना टळली असून, त्यांच्या कामगिरीचे परिसरात कौतुक होत आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आत्मसात करा - जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण

**जालना । प्रतिनिधी** - रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांचे मौल्यवान विचार आत्मसात करण्याचा प्रयत्न करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी केले.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत स्वराज्याचे संस्थापक, जाती धर्माच्या भिंती भेदून, रयतेच्या मनावर राज्य करणारे राजे छत्रपती शिवाजी महाराज हे पराक्रमी शूरवीर राजे होते असे जिल्हाध्यक्ष चव्हाण बोलताना म्हणाले . राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनीही आपल्या राजकीय जीवनात कधी जातीपातीचे राजकारण केले नाही. कामाशी बांधिलकी, जनतेबद्दल कळवळा, जनतेवर प्रेम करणारा नेता म्हणून अजितदादांची ओळख निर्माण झाली होती. परंतु काळाने त्यांच्यावर घाला घातला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांचे विचार व प्रेरणा आत्मसात करणे हीच खरी अजितदादांना श्रद्धांजली ठरेल असेही शेवटी जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांनी म्हटले. कार्यक्रमास प्रदेश सरचिटणीस रवींद्र तौर, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे, जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर, जिल्हा महिला अध्यक्ष मंगला पाटील, कामगार विभागाचे सतीश वाहुळे, दिलीप तात्या क्षीरसागर,शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायड, युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे, जेष्ठ कार्यकर्ते गणेश कावळे, विजय सोनवणे, गणेश नवपुते, आर . के . राठोड, राहुल लष्कर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



## जिजाऊ संकुल टेंभुर्णी येथे क्रीडा सप्ताहाचे उदघाटन




**टेंभुर्णी** - येथील जिजाऊ संकुल येथील जिजाऊ इंग्लिश स्कूल, टेंभुर्णी व जिजामाता इंग्लिश स्कूल वरुड बुद्रुक, यांच्या संयुक्त क्रीडा महोत्सवाचे उद्घाटनडॉक्टर सुरेखा लहाने यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर सुरेखा लाने घ्या होत्या प्रमुख पाहुणे म्हणून, वेद रायगडाचे प्रतिष्ठान महाराष्ट्राचे प्रांत उपाध्यक्ष प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख, माजी उपसभापती दिनकर उखर्डे, प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्राचे जाफराबाद तालुका अध्यक्ष शेख अशपाक, सीनियर कॉलेजचे प्राचार्य पंजाबराव लहाने, प्राचार्य संजय फलटणकर, वरुड बुद्रुक चे सोनवणे सर, मोकळे सर, मस्के सर, बोऱ्हाडे मॅडम, शेख मॅडम, तसेच पालकांची उपस्थिती होती. प्रसंगी दोन्ही शाळांचे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर वृंदा उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर म्हणाले की खेळातूनच जीवनाला आकार मिळतो. खेळ हे शिक्षणातही महत्त्वाचे असून खेळासाठी आपण वेळ दिला पाहिजे. त्यामुळे केजी टू पीजीपर्यंत खेळायला महत्त्व आलेले असून मी शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्य विकास आणि खेळाला महत्त्व आहे. याप्रसंगी मुलांनी लेझीम डंबेल्स आणि विविध प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रम याचे आयोजन करण्यात आले होते आणि त्याचे सादरीकरण सुद्धा झाले. तसेच मुलांच्या शारीरिक कवायती सुद्धा संपन्न झाल्या. याप्रसंगी रनिंग चे उद्घाटन सुद्धा करण्यात आले. याप्रसंगी संजय फलटणकर यांनी उपस्थितांचे सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन सुद्रिक मॅडम यांनी केले.



## शिष्टेकडी परिसर झळकला स्वच्छतेने; बातमीची दखल घेत जालना महानगरपालिकाची तातडीची कारवाई

# नागरिकांमध्ये समाधान; नियमित स्वच्छतेची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील प्रभाग क्रमांक १०



मधील शिष्टेकडी परिसरात निर्माण झालेल्या अस्वच्छतेच्या समस्येची प्रसारमाध्यमांनी दखल घेतल्यानंतर अखेर प्रशासन खडबडून जागे झाले आहे. दोन दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या बातमीनंतर जालना महानगरपालिकाने तातडीने हालचाल करत आज सकाळी व्यापक स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला.

काही दिवसांपासून शिष्टेकडी भागात कचऱ्याचे ढिगारे साचले होते. नाल्यांची नियमित साफसफाई न झाल्याने दुर्गंधी पसरली होती. डासांचे प्रमाण वाढल्यामुळे साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला होता. तसेच पाणीपुरवठ्याबाबतही नागरिकांमध्ये नाराजी होती. या सर्व समस्यांमुळे स्थानिक रहिवासी संतप्त झाले होते आणि त्वरित कारवाईची मागणी करत होते.

बातमी प्रसारित होताच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर स्वच्छता विभागाला तत्काळ आदेश देण्यात आले. कर्मचारी आणि यंत्रसामग्रीच्या मदतीने साचलेला कचरा हटविण्यात आला, नाल्यांची साफसफाई करण्यात आली.

अचानक झालेल्या या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आमच्या समस्या माध्यमांनी पुढे आणल्या आणि प्रशासनाने त्वरित प्रतिसाद दिला, ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र पुढेही नियमित स्वच्छता राखली जावी, अशी अपेक्षा स्थानिकांनी व्यक्त केली.

दरम्यान, शहरात स्वच्छतेबाबत कायमस्वरूपी उपाययोजना राबवून अशा समस्या पुन्हा उद्भवू नयेत, यासाठी प्रशासनाने अधिक दक्षता घ्यावी,

अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. शिष्टेकडी परिसरातील ही कारवाई शहरातील इतर भागांसाठीही आदर्श ठरेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

## जालन्यात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील अंबड चौफुली,मंठा बायपास रोड जवळ असलेल्या वंचित बहुजन आघाडीच्या मराठवाडा विभागीय जनसंपर्क कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांच्या हस्ते पुषहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत ओबीसी जिल्हा समन्वयक सुंदरलाल बगीनवाल,सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष सुरज सोनोवने, जिल्हा संघटक राजेंद्र खरात,विलास नरवडे, गौतम वाघमारे राजरत्न आचलखांब संजय आदमाने , सत्यपाल गायकवाड, विलास भिंगारे, गणेश शिंदे,नितीन बाळराज,बोरखेडी सरपंच मनोहर म्हस्के,संकेत दांडगे सुरज काकडे, कपिल सुर्यनारायण, सुरेश आदमाने यांच्या सह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी उत्साहात साजरी करण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, नायब तहसीलदार तुषार निकम, किशोर तायडे, विक्रांत मोंढे, दिपाली राऊत(वानखडे), अतुल केदार,विठ्ठल बोरकर, सुनिल काळुंके, संतोष पगार, कुणाल पेरके,दिलीप दाभाडे, इंद्रजीत नानोटे, अनिल हिवाळे आदीची उपस्थिती होती.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या अभ्यासासाठी मालवण येथे अध्यासन केंद्र - सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई । प्रतिनिधी -** सिंधुदुर्गातील सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग, राजकोट आणि सर्जेकोट या चार किल्ल्यांच्या सखोल अभ्यासासाठी मुंबई विद्यापीठअंतर्गत स्वतंत्र अध्यासन केंद्र उभारण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाकडून ५० लाख रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली. या निर्णयामुळे सिंधुदुर्गातील किल्ल्यांच्या अभ्यास, संशोधन आणि दस्तावेजीकरणाला नवी दिशा मिळणार असून हे अध्यासन मालवण येथे स्थापन होणार आहे.

हे अध्यासन केंद्र ऐतिहासिक कागदपत्रांचे संकलन, संशोधन प्रबंध, व्याख्यानमाला, युवा संशोधकांना मार्गदर्शन आणि सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग, राजकोट, सर्जे कोट या चारही किल्ल्यांच्या वारशाचे शास्त्रशुद्ध नोंदणीकरण अशा बहुआयामी उपक्रमांसाठी कार्य करणार आहे. शिवकालीन व्यापाराचे महत्वाचे केंद्र म्हणून ओळखल्या गेलेल्या या भागातील ऐतिहासिक दाखल्यांचा सखोल अभ्यास होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि दूरदृष्टीचा व्यापक प्रसार करण्यास हे अध्यासन हातभार लावेल, असा विश्वास सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांनी व्यक्त केला आहे. सिंधुदुर्ग किल्ल्याला ३५८ वर्षे १२ एप्रिल २०२५ ला पूर्ण झाली, त्या निमित्ताने आयोजित केलेल्या गडावरील सांस्कृतिक कार्यक्रमात मंत्री अँड शेलार यांनी या अध्यासनाची घोषणा केली होती. पालकमंत्री नितेश राणे आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी मालवण मधील या विषयाच्या तज्ज्ञांना घेऊन प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. त्याचा अभ्यास करून शासनाने या अध्यासनाची रचना केली आहे.

सिंधुदुर्ग किल्ला, पद्मदुर्ग किल्ला, राजकोट किल्ला आणि सर्जेकोट किल्ला या चार किल्ल्यांबद्दल अभ्यासपूर्ण माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे, या विषयासंदर्भात सर्व कागदपत्रे जमा करून त्यावर अभ्यास करावा लागणार आहे. याठिकाणी व्यापाराचे बेट होते, त्याबाबतचे ऐतिहासिक दस्तावेज उपलब्ध आहेत. सांस्कृतिक कार्य विभागाकडून मुंबई विद्यापीठाला सिंधुदुर्ग किल्ला, पद्मदुर्ग किल्ला, राजकोट किल्ला आणि सर्जेकोट किल्ला या चारही किल्ल्यांच्या अभ्यासासाठी अध्ययन केंद्राची आवश्यकता होती. त्याला मुर्त स्वरूप देत त्यासाठी आवश्यक असणारा ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली आहे.

याद्वारे जास्तीत जास्त युवकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून प्रेरणा घ्यावी, देश घडवावा, राज्य घडवावे आणि त्याचा अभ्यास करावा. असे सांस्कृतिक मंत्री मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले.

# जालना शहरातील चंदनझीरा येथे शिवजयंतीनिमित्त आकर्षक रांगोळी

### शिवराय आणि महात्मा फुले यांच्या कार्याचा सुरेख देखावा; माळी महासंघाचा उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील चंदनझीरा परिसरातील महात्मा फुले चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. माळी महासंघाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या ऐतिहासिक कार्यावर आधारित आकर्षक रांगोळी साकारण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी सर्वप्रथम महात्मा ज्योतिराव फुले यांनी शोधून काढली आणि त्यानंतर शिवजयंती साजरी करण्याची परंपरा सुरू केली, हा ऐतिहासिक प्रसंग रांगोळीच्या माध्यमातून अत्यंत देखण्या स्वरूपात मांडण्यात आला. या देखाव्याने उपस्थित शिवभक्तांचे लक्ष वेधून घेतले.

या उपक्रमाचे आयोजन माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष संतोष रासवे यांच्या



नेतृत्वाखाली करण्यात आले. पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या विविध शाळांतील विद्यार्थ्यांना तसेच परिसरातील शिवभक्तांना बिस्किटे आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती चंदनझीरा यांच्या वतीने आयोजित पालखी मिरवणुकीत सहभाग नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माळी महासंघाच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले स्मारक येथे विशेष खाऊ वाटप कार्यक्रमही घेण्यात आला.

छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची प्रेरणा आणि महात्मा फुले यांच्या सामाजिक विचारांची शिकवण पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या उपक्रमासाठी दिनेश दैने, रामेश्वर गाडेकर, सचिन दैने, श्याम खरात, लक्ष्मण घनवट, अनिल तरासे, भागाजी डोके, सगुणदास घायाळ, सुरेश गोरे, करण गाडेकर, प्रदीप रासवे, मुंजा गोरे, शाम विधाते, करण मोठे, गणेश मोठे, ओमकार खरे, प्रताप वाजे, पांडुरंग बुलबुले, आकाश शिंदे, जय गाडेकर, अंबादास चित्तेकर आदींचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळी चंदनझीरा प्रभागाचे नगरसेवक अनिल तिरुखे, सौ. मयुरी दिनेश दैने, अनिल बोर्डे, माजेद खान, रितेश पंचरिया, गणपत भद्रे, रावसाहेब मंडळकर, सार्थक विधाते, प्रथमेश रासवे, फारुख टेलर, गणेश इंचे, दिनेश मुख्यदयाल आदींची विशेष उपस्थिती होती.



**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत जालना जिल्हा स्तरीय कृषि तंत्र विद्यालयीन कबड्डी स्पर्धेत कै.चुडामण पाटील कृषि तंत्र विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला. विजयी संघाचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. डॉ.संजय लाखे पाटील, प्रशासकीय अधिकारी रमेश गजर, प्राचार्य डॉ.श्रीकांत सरोदे, प्रा.डॉ नरसिंग पवार , विष्णु भोसले,अनिल पडुळ आदीनीं विजयी संघाचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या**



**बंजारा कॉलोनी जालना येथे हिंदवी स्वराज्य संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती साजरी करण्यात आली.निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात कॉलनीतील सर्व मान्यवर उपस्थित होते.**

# ब्राह्मण सभा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**जालना । प्रतिनिधी -** दि. १९ फेब्रुवारी रोजी ब्राह्मण सभा भवन येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती चे आयोजन करण्यात आले होते. सर्व प्रथम श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन पूजन करण्यात आले. कार्यक्रमास ब्राह्मण सभेचे अध्यक्ष श्री कल्याणराव देशपांडे, श्री रमेश देहेडकर, डॉ. सुभाष भाले, रसनाताई देहेडकर,डॉ.प्रकाश शिगेदार, प्रतिभा रेंगे,यांच्या सह ब्राह्मण समाज जालनाचे रवींद्र देशपांडे, सिद्धिविनायक मुळे,सामूहिक उपनयन संस्कार चे अध्यक्ष श्री सतिश अकोलकर, ब्राह्मण समाज जालना चे भगवान पुराणिक, सुरेंद्र न्यायाधीश, विश्वंभर कुलकर्णी, प्रसाद पाटील, महिला समिती अध्यक्ष सौ. माधुरी बावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मान्यवरांनी उपस्थितांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल माहिती देऊन अभिवादन केले. यावेळी बोलताना कल्याण राव देशपांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची सत्ता संपत्ती आणि संघटन ही त्रिसूत्री अमलात आणावी व समाजाने संघटन मजबूत करावे. समाजाने सर्वसमावेशक कार्य करून समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन सामाजिक कार्यात आपले योगदान दिले पाहिजे. युवा पिढी घडविण्यासाठी प्रयत्न करावे असे संबोधन केले. यावेळी स्मिता वझरकर,माधुरी पोतदार, वर्षा मुळे, अर्चना अकोलकर, अरूणा कुलकर्णी, आरती नाईक, सुरेखा सुर्यवंशी, राजेश खिस्ते,गजानन कुलकर्णी, गणेश कुलकर्णी, जयवंत मुळे, धनंजय पैठणकर, रमेश फुलमामडीकर, राजेश एंगाटे, नंदकुमार देशपांडे, एस. पी. पुराणिक, शिवाजी जोशी, सि. डी. देशमुख, पांडुरंग मिरजकर, मधुकर वैद्य आदी उपस्थित होते.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.